नि. दि. दावा क्र.२४/२०१३

नि. क्र. १३४

**<u>शपथेवर पुढील सरतपास साक्षीदार क ३ वादी क. १ तर्फे ॲड. श्री. मुळे</u>**

१. न्यायालयात दाखल केलेल्या शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे.

**<u>प्रतिवादी क. ४ ते ८ तर्फे ॲड श्रीमती जयश्री पवार यांचा तिन वेळा पुकारा केला असता गैरहजर कोणताही तहकुबीचाअर्ज नाहीकृम्हणुन उलटतपास नाही.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क १ ते ३ ॲड श्री एस. पांडे यांच्यामार्फत</u>**

२. माझी जन्मतारीख १६.७.१९८५ आहे. माझे वडील तानबा यांची तब्येत चांगली आहे. ते हिंडतात, फिरतात. मी माझ्या वडीलांसोबत राहतो. रेखा रविंद्र वराडे ही नागपुर स्थित रेशीमबाग येथे राहते. ती मरण पावली आहे. माझे वडील तानबा स्वत: शेती टेकाडी येथे करतात. मी सुध्दा शेती करतो. मी व माझे वडील तानबा हे तिष्ठी या गावी वादमिळकतीवर कोणत्या कोणत्या तारखांना आलो याची नोंद आमच्याकडे नाही. खसरा क्र. ९२ व ईतर क्रमांकांची म्हणजेच वादमिळतीची आराजी मला माहीत नाही. तसेच मला या जमीनीच्या चतु: सीमा देखील माहीत नाही. चंद्रभागाबाई वाकोडे या केव्हा मरण पावल्या हे मला माहीत नाही. माझी आजी कमलाबाई ही १९९६-९७ मध्ये वारली. हे म्हणणे खरे नाही की कमलाबाईला कधी तिष्ठी गावी पाहील नाही. १९९६ साली मी साधारण १२ वर्षांचा असेल. चंद्रभागाबाई व कमला बाई हे तिष्ठीस्थित वादातील जमीनीच्या ताब्यामध्ये असल्याबाबत मी ऐकले होते. त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी पाहीला नाही.

३. मी दादाराव ठाकरे यांना ओळखत नाही. मी शोभाबाई ठाकरे यांना ओळखत नाही. दादाराव ठाकरे हे गावाचे सरपंच असल्याने मी ऐकीव रीत्या मी त्याना ओळखतो. शोभाबाई या दादारावच्या पत्नी. दादाराव मरेपर्यंत तिष्ठीला राहीले असल्याबाबत मला माहीत नाही. दादाराव त्यांच्या मृत्युपर्यंत वादातील

मिळकतीच्या ताब्यात असल्याबाबत मला माहीती नाही. दादाराव यांच्या मृत्युनंतर वादातील मिळत शोभाबाई वाहत असल्याबाबतची मला कल्पना नाही. वाद मिळकती संदर्भात पुर्वी जी कायदेशीर प्रकरण झाली त्याबाबत मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की मला या प्रकरणाची माहीती नसुन मी खोटे शपथपत्र दाखल केले.

फेरतपास नाही.

माझे समक्ष, सा.ब.वा.दा.क.केले.

स्वाक्षरी स्वाक्षरी

दि.न्या.क.स्तर,कळमेश्वर.

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,कळमेश्वर.

**दिनांक : १९.१०.२०१८.**